01-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/31/2025 11:06 PM Page 1



निवडक



काणकोण : मनोहर पर्रिकर बगल मार्गाची पाहणी करताना नगरसेवक व अधिकारी.

## मनोहर पर्रिकर बगल मार्गाची नगरसेवक व अधिकाऱ्यांकडून पाहणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ३१ :** चार–रस्ता ते गाल्जिबाग पर्यंतच्या मनोहर पर्रीकर बगल मार्गावर कित्येक समस्या निर्माण झालेल्या आहे. या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने काणकोण नगरपालिकेचे नगरसेवक शुभम कोमरपंत यांनी रस्ता विभागाला निवेदन सादर केले होते.
त्या निवेदनाची दखल घेऊन सार्वजनिक बांधकाम खात्याच्या महामार्ग विभागाच्या अभियंत्यांनी नुकतेच मनोहर बगल मार्गाची पाहणी केली. यावेळी नगरसेवक शुभम कोमरपंत, सुनय कोमरपंत उपस्थित होते.
या रस्त्यावर विविध ठिकाणी पडलेले खड्डे, रस्त्याच्या बाजूने असलेल्या पथदीपाचे दिवे पेटत नसल्याचे नगरसेवक श्री कोमरपंत यांनी अभियंत्यांच्या नजरेस आणून दिले. बऱ्याच ठिकाणी दिशादर्शक फलक नसल्यामुळे पर्यटकांची गैरसोय होत असल्याचे श्री कोमरपंत यांनी दाखवून दिले.

---

## दहशतवाद संपवावा; तीच पहलगाम हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली : देशभक्त

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ३१ :** पहलगाम येथे घडलेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ भारतीय पर्यटक शहीद झाले. त्या घटनेने संपूर्ण भारत देश शोकसागरात आहे, त्यामुळे हीच संधी साधून काश्मीर प्रांतात तसेच पूर्व दक्षिण सीमेवरील व्याप्त भाग ताब्यात घेऊन दहशतवाद विरोधी असल्याचे जगाला दाखवून द्यावे. सींधुर ऑपरेशन मुळे संभाव्य दहशतवाद संपवला जाईल व तीच खरी श्रद्धांजली असेल, असे मत अनेक देशाभिमानी नागरिक व्यक्त करतात.
देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह तसेच वायू,हवाई व नाविक दलाच्या अधिकारी जवानांनी कठोर परिश्रम घेत सिंदुर ऑपरेशन यशस्वी केले त्याबद्दल भारतीयांना अतीव आनंद झाला आहे. भारत देशाचा अर्थसंकल्प व त्यातील ४० टक्के भाग संरक्षण विभागासाठी तरतूद असते. त्याचा वापर पाक व अन्य शेजारी शत्रू राष्ट्रे भारतात अराजकता माजवित असते. त्यामुळे अराजकता कायम संपुष्टात आणण्यासाठी सिंधुर ऑपरेशन संधी मानून, पाक व अन्य शस्त्र राष्ट्राचे कंबरडे मोडले जाईल व दहशतवाद निकामी होईल,ह्यासाठी भारताने पावले उचलण्याची गरज आहे,असे मत हरमळचे माजी सरपंच रामचंद्र केरकर यांनी व्यक्त केले.
भारत देशाची अर्थव्यवस्था डबघाईस येण्यास दहशतवाद कारण असून त्यावर तरतूद खर्चिक असून, त्यातील काही टक्के रक्कम स्थायी विकास कामांवर तसेच दळणवळण यंत्रणा उपलब्ध करण्याच्या कामी येऊ शकतात.
पाकच्या पोसलेल्या दहशतवादामुळे कित्येक भारतीय मृत्युमुखी पडले, अनेकांचे संसार धुळीस मिळाले. मात्र बलाढ्य भारत देश अद्याप त्याच दलदलीत रुतून बसला ह्याचे आश्चर्य वाटते.जगाच्या इतिहासात भारत देश चौथा क्रमांकावर असून लवकरच प्रथम तीन स्थांनात भारत देश असेल, असे सांगून भारतीयांना अतीव आनंद होईल, असे नामदेव तुळसकर यांनी सांगितले.
या संधीचा पुरेपूर वापर करून भारताने पाकव्याप्त व अन्य भुभाग ताब्यात घेऊन अखंड व विशाल भारत देश नकाशावर विराजित होईल ह्याची खात्री द्यावी. पंतप्रधान नरेंद्र मोदी है तो मुमकिन है, अशा घोषणा देऊन भारतीय व काश्मीर व अन्य भागातील नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

---

## जनशक्ती वेल्फेअर असोसिएशनचा उद्या वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ३० :** जनशक्ती वेल्फेअर असोसिएशन, केळबाय कुर्टी फोंडा गोवा ही संस्था आपला १५ वा वर्धापनदिन कार्यक्रम रविवार दि. १ जून रोजी संध्याकाळी ७.३० वाजता केळबाय कुर्टी फोंडा येथील श्री कृष्ण देवालय सभागृहात आयोजित करीत आहे.
सदर कार्यक्रमात वर्ष २०२३–२४ व २०२४–२५ दहावी व बारावी पास झालेल्या गावच्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेले श्री अमेय उच्च माध्यमिक विद्यालय, कुर्टी चे प्राचार्य श्री सुभाष जाण या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहे. तसेच कला अकादमी थिएटर आर्ट कॉलेज चे सहाय्यक प्राध्यापक श्री श्रीकांत गावडे उपस्थित असणार आहे. सर्वांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे व कार्यक्रम यशस्वी करावा असे समितीतर्फे कळविण्यात आले आहे.

# स्मार्ट सिटीमधील सर्व रस्ते पूर्ण केल्याचे जाहीर

## अंतिम मुदतीनुसार रस्ता नागरिकांसाठी खुला | अधिकाऱ्यांची महिती

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३१ :** अनेक वेळा मुदतीचा भंग आणि उच्च न्यायालयाच्या बारकाईने देखरेखीखाली असलेल्या प्रकल्पानंतर, इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेड ने शनिवारी (३१ मे) अधिकृतपणे जाहीर केले की, पणजी स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत प्रलंबित असलेले सर्व रस्त्यांचे काम पूर्ण झाले आहे. यामध्ये सांतइनेज परिसरातील नव्याने बांधलेला शेवटचा काँक्रीट रस्ताही समाविष्ट आहे, जो न्यायालयाने ठरवून दिलेल्या अंतिम मुदतीनुसार आजपासून (३१ मे) नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे.

सुमारे २०० मीटर लांबीचा हा रस्ता ताडमाड परिसरापासून टोंका सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पापर्यंत जातो. भूमिगत पायाभूत सुविधांच्या गुंतागुंतीमुळे आणि भूगर्भातील पाण्याच्या अडचणीमुळे हे काम दीर्घकाळ रखडले होते. पाण्याचे



निर्जलीकरण, सैल मातीचा सामना, सुरक्षित उत्खनन आणि उच्च जलपातळीशी निगडीत अनेक तांत्रिक अडचणींचा उल्लेख इमॅजिन पणजीने केला आहे.

या रस्त्याच्या कामादरम्यान स्थानिक सांडपाणी व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठी ७१० मिमी व्यासाच्या ट्रंक सीवरेज लाइनची स्थापना करण्यात आली आहे. त्याशिवाय नवीन मॅनहोल्स, घरगुती कनेक्शनसाठी चेंबर्स, युटिलिटी डक्ट्स आणि विविध सेवा क्रॉसिंग्स यांचा समावेश करण्यात आला आहे.

ईमॅजिन पणजीच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, कामादरम्यान सांतइनेझ येथील ऐतिहासिक मंदिर आणि तेथील जुना वटवृक्ष यांचे संरक्षण राखण्यात आले. स्थानिक वारसा व पर्यावरण यांची जपणूक करत कामाची अंमलबजावणी करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

रस्ता पूर्णपणे काँक्रीटने संरक्षित असून, सुधारित निचरा प्रणाली (ड्रेनेज) व नव्याने तयार करण्यात आलेले पदपथ यामुळे या मार्गावर वाहतुकीची सोय आता अधिक सुलभ झाली आहे. इमॅजिन पणजीने स्पष्ट केले की, या उद्घखाटनानंतर पणजी शहरातील स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत प्रस्तावित सर्व रस्ते कामे पूर्ण झाली असून, नियोजित वेळेत यशस्वी अंमलबजावणी झाल्याचा दावा संस्थेने केला आहे.

# राष्ट्रीय महामार्गावरील झाडांच्या फांद्या धोक्याचे कारण

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३१ :** राष्ट्रीय महामार्ग ६६ वर मडगाव ते काणकोण या मार्गावर झाडांच्या वाढलेल्या फांद्यांमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांबाबत स्थानिक नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण झाली आहे. सार्वजनिक सुरक्षेला धोका पोहोचवत असल्याने या फांद्या त्वरित छाटाव्यात, अशी मागणी स्थानिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक गंभीर बनली आहे. मुसळधार वाऱ्यांमुळे फांद्या रस्त्यावर पडत असून त्यामुळे अपघात, वीजपुरवठा खंडित होणे आणि वाहतूक कोंडी यासारख्या घटनांमध्ये वाढ होत आहे.

साओ होजे द अरिअल येथील विद्यार्थिनी मारिया ग्रासियास हिने या विषयाकडे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक प्रशासनाला पत्र लिहिले आहे. ही झाडे नियमित प्रवाशांसाठी मोठा धोका आहेत. पावसात वाऱ्यामुळे मोठ्या फांद्या रस्त्यावर पडतात. त्यामुळे अपघात घडतात, विजेची तार तुटते आणि वाहतूक ठप्प होते. अनेकदा प्राणघातक परिस्थिती निर्माण होते, असे ती म्हणाली.

तिने स्पष्ट केले की, अशा फांद्या वेळेवर न हटवल्यास आणखी गंभीर घटना घडू शकतात. यामुळे आपत्कालीन सेवांनाही विलंब होतो, अशी तक्रार तिने नोंदवली. सेरावली येथील विद्यार्थिनी लुक्रेंशिया गोम्स हिने सांगितले की, रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या झाडांमुळे प्रकाशयोजना अडथळ्यात येतात. रस्त्यावरील झाडे दिव्यांचा प्रकाश अडवतात. त्यामुळे रात्रीच्या वेळी दृश्यमानता अत्यंत कमी होते. दुचाकीस्वारांसाठी ही परिस्थिती जीवघेणी ठरू शकते, असे ती म्हणाली.तिने हेही नमूद केले की, रस्त्याच्या कडेला वाढलेली झुडपे लेन शिस्त राखण्यात अडथळा निर्माण करत आहेत.

कुंकळ्ळी येथील रहिवासी रेखा देसाई यांनी यावर संतप्त प्रतिक्रिया दिली. आम्ही महिन्यांपासून तक्रारी करत आहोत, पण प्रशासन फक्त अपघातानंतरच जागं होतं. जीव गमावण्यापूर्वीच त्यांना कारवाई करावी लागेल, असा इशारा त्यांनी दिला.

कुंकळ्ळीचेच पंढरी देसाई यांनीही चिंता व्यक्त केली. महामार्गावर अनेक ठिकाणी आंधळे वळणं आणि अरुंद रस्ते आहेत. त्यात झाडांच्या फांद्यांमुळे हा मार्ग अधिक धोकादायक ठरतो. शाळकरी मुले, वृद्ध आणि दररोज प्रवास करणारे नागरिक मोठ्या धोका पत्करत आहेत, असे त्यांनी सांगितले. नागरिकांनी एकमुखाने झाडे छाटण्याची मोहीम तातडीने राबवावी, अशी मागणी केली आहे. ही बाब केवळ सौंदर्य किंवा देखभालीपुरती मर्यादित न ठेवता सार्वजनिक सुरक्षेचा भाग म्हणून पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रशासनाने याबाबत त्वरित हालचाल न केल्यास मोठ्या प्रमाणावर अपघात होण्याची शक्यता वर्तवली जात असून, नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या जीवित सुरक्षिततेसाठी तत्काळ उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी आता पुढे येत आहे.

# गोवा सरकारच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३१ :** नगर नियोजन कायदा, १९७४ मधील कलम १७(२) रद्द करण्यासंदर्भात गोवा उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला आव्हान देणारी गोवा सरकारची विशेष अनुमति याचिका (एसएलपी) सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी जुलैपर्यंत तहकूब केली आहे.

हे प्रकरण न्यायालय क्रमांक ३ समोर सुनावणीसाठी आले असता, राज्य सरकारने स्थगितीची मागणी केली. त्यानुसार, सर्वोच्च न्यायालयाने प्रकरण २१ जुलै रोजी नियमित खंडपीठासमोर सुनावणीसाठी सूचीबद्ध करण्याचे आदेश दिले.

गोवा सरकारने उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात १३ मार्च रोजी दोन अपिल याचिका दाखल केल्या आहेत. त्या क्रमशः पीआयएल रिट याचिका क्रमांक १६/२०२३, १७/२०२३ आणि २३१७/२०२३ या आहेत. या प्रकरणांमध्ये कलम १७(२) ची वैधता आणि त्याची अंमलबजावणी याविषयी वाद निर्माण झाला आहे.

राज्य सरकारने २८ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाला पत्राद्वारे या याचिकेची तातडीने सुनावणी घेण्याची विनंती केली होती. या विनंतीनंतर प्रकरण सुट्टीतील खंडपीठासमोर मांडण्यात आले. मात्र सरकारनेच स्थगितीची मागणी केल्यामुळे प्रकरण पुढे ढकलण्यात आले.

वरिष्ठ विधिज्ञ मुकुल रोहतगी यांच्या कार्यालयातून पाठवण्यात आलेल्या पत्रात म्हटले आहे की, गोवा फाउंडेशन या पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्थेच्या वकिलांना या प्रकरणाची पूर्वसूचना देण्यात आली होती. या संस्थेने यापूर्वी कॅव्हिएट दाखल केले होते.

उच्च न्यायालयाने स्वतःच वादग्रस्त निर्णयाच्या अंमलबजावणीला सहा आठवड्यांची स्थगिती दिली असून, याचिकाकर्त्याला सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याचा पर्याय खुला ठेवला आहे, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

कलम १७(२) अंतर्गत आवश्यक त्या कायदेशीर प्रक्रिया न केल्यास याचिकाकर्त्याला गंभीर व अपूरणीय नुकसान होण्याची शक्यता आहे. विशेषतः नियोजन प्रक्रियेस प्रत्यक्ष फटका बसू शकतो. तसेच, या कलमासंदर्भातील अनेक प्रकरणे सध्या उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत, आणि सद्य निर्णयाचा त्यावर परिणाम होऊ शकतो, असे पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. पत्राच्या शेवटी नमूद करण्यात आले आहे की, या प्रकरणाचे अत्यंत गंभीर आणि तातडीचे स्वरूप लक्षात घेता, ही याचिका शक्य तितक्या लवकर सुनावणीसाठी सूचीबद्ध करावी, अन्यथा याचिकाकर्त्याला अपूरणीय नुकसान आणि पूर्वग्रह सहन करावा लागू शकतो.

दरम्यान, गोवा फाउंडेशनने या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना सरकारच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली आहे. राज्य सरकारने दोन वेगवेगळ्या एसएलपी दाखल केल्या आहेत. एक मुख्य सचिवांच्या वतीने आणि दुसरी टीसीपी विभागाच्या वतीने. विशेष म्हणजे, दोन्ही याचिकांसाठी दोन वरिष्ठ वकिलांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे सरकारच्या भूमिकेतील विसंगती आणि संभ्रम वाढल्याचे दिसून येते, असे संस्थेने म्हटले आहे.

# पुराच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढा

## जुन्या स्टेशन रोडवरील व्यापाऱ्यांची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३१ :** जुन्या स्टेशन रोडवरील व्यापाऱ्यांनी दरवर्षी पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पूरपरिस्थितीवरून नाराजी व्यक्त करत मडगाव नगरपालिकेकडे तात्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे.

दर पावसाळ्यात दुकानांमध्ये पाणी शिरल्याने होणाऱ्या आर्थिक नुकसानीचा तसेच ग्राहकांचा ओघ कमी होण्याचा फटका स्थानिक व्यावसायिकांना वारंवार बसतो. या समस्येवर वर्षानुवर्षे तक्रारी करूनही कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

स्थानिक दुकानदारांनी पूरस्थितीचे मुख्य कारण म्हणजे अपुरी व असमर्थ ड्रेनेज यंत्रणा आणि नियमित गाळ सफाई न होणे, असे स्पष्ट केले. नाल्यांमध्ये साचलेला कचरा वेळेवर न काढल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर साचते आणि थेट दुकानांमध्ये शिरते, असे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

दर पावसाळ्यात आमच्या दुकानांमध्ये पाणी घुसते. त्यामुळे मालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. शिवाय, ग्राहकांचा ओघही घटतो. आम्ही कित्येक वेळा नगरपालिकेला याबाबत कळवले आहे, पण काहीच ठोस कृती अद्याप झाली नाही, असे एका स्थानिक दुकान मालकाने नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले.

इतर व्यापाऱ्यांनीही याच मुद्द्याला दुजोरा देत, सध्या नगरपालिकेने उचललेल्या तात्पुरत्या उपाययोजना अपुऱ्या आणि अल्पकालीन असल्याची टीका केली. शेवटच्या क्षणी नाल्यांची सफाई करून समस्येचे निराकरण होणार नाही. यासाठी कायमस्वरूपी पायाभूत सुधारणा आवश्यक आहेत, असे एका व्यावसायिकाने सांगितले.

ही समस्या केवळ दुकानदारांपुरती मर्यादित नसून, ओल्ड स्टेशन रोडचा वापर करणाऱ्या सामान्य नागरिकांनाही त्याचा त्रास सहन करावा लागतो. निसरडे रस्ते, पाण्यात साचलेले घाण आणि गाळ यामुळे पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या २० वर्षांपासून आम्ही येथे व्यवसाय करतो आहोत. पण ही समस्या कायम आहे. आता ती असह्य झाली आहे, असे आणखी एका दुकान मालकाने सांगितले.

व्यापाऱ्यांनी मागणी केली आहे की, महापालिकेने नाल्यांची नियमित गाळसफाई, सक्षम ड्रेनेज सिस्टीमची उभारणी आणि वर्षभर देखभालीची यंत्रणा कार्यान्वित करावी. जोपर्यंत नगरपालिका गंभीरपणे या समस्येकडे पाहत नाही, तोपर्यंत पूरस्थिती वारंवार उद्भवत राहील आणि स्थानिक व्यापारावर त्याचा मोठा परिणाम होईल, असे मत काही व्यापाऱ्यांनी व्यक्त केले.

जर पालिकेने तातडीने योग्य पावले उचलली नाहीत, तर व्यापाऱ्यांनी आता जिल्हा प्रशासन किंवा राज्यस्तरीय अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याचा विचार सुरू केला आहे. नगरपालिकेने नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करून त्वरित उपाययोजना राबवाव्यात, अशी स्पष्ट मागणी या व्यापाऱ्यांकडून करण्यात आली आहे.

# दूध उत्पादकांना आधारभूत दर नाकारण्याऱ्यांवर होणार कारवाई

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ३१ :** मागील पाच महिन्यांपासून दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधारभूत किंमत मिळालेली नाही, ही गंभीर बाब असून यामागे कोण जबाबदार आहे याची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई केली जाईल, असे स्पष्ट आश्वासन सहकार मंत्री सुभाष शिरोडकर यांनी शनिवारी दिले.

गोवा डेअरी परिसरात आयोजित कार्यक्रमात जिल्हा खनिज निधीतून प्राप्त झालेल्या दोन मोबाईल पशुवैद्यकीय रुग्णवाहिकांचे उद्घाटन मंत्री शिरोडकर यांच्या हस्ते झाले. दूध दरांबाबत झालेला विलंब हा शेतकऱ्यांच्या न्याय हक्काचा भंग आहे. त्यामुळे त्यांच्या उत्पादनक्षमतेवरही परिणाम होतो आहे, असे मंत्री शिरोडकर यांनी नमूद केले.



तसेच अशा प्रकारच्या विलंबाची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर तातडीने कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या नव्या मोबाईल पशुवैद्यकीय रुग्णवाहिका शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून, दुधाळ जनावरांसाठी वेळेवर वैद्यकीय सेवा मिळवण्यास यामुळे मदत होणार आहे. या रुग्णवाहिकांमुळे दुग्ध व्यवसायात सातत्य ठेवण्यास शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे, असे मंत्री शिरोडकर म्हणाले.

२९ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'विकसित भारत – विकसित शेती' अभियानाचा उल्लेख करताना मंत्री शिरोडकर म्हणाले की , देशभरात १६,००० पेक्षा अधिक शास्त्रज्ञ भारतीय कृषी संशोधन संस्थांमध्ये कार्यरत असून, त्यांनी उच्च उत्पादनक्षम पिकांच्या जाती विकसित करण्यावर भर दिला आहे. शेतकऱ्यांनी या शास्त्रज्ञांशी संपर्कात राहावे.राज्य सरकारने सुद्धा ६० गावांमध्ये १५ दिवसांचे शेती विकास अभियान राबवले असून, त्यामार्फत शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाची माहिती देण्यावर भर दिला जात आहे.

गोव्यातील शेतकऱ्यांच्या वाढत्या पिण्याच्या पाण्याच्या गरजा लक्षात घेता, राज्य सरकारने ५०० नवीन बंधारे उभारण्याचे लक्ष्य ठेवले आहे, अशी माहितीही मंत्री शिरोडकर यांनी दिली.कार्यक्रमात उपस्थित असलेल्या गोवा डेअरीचे अध्यक्ष पराग नगरसेकर यांनी सांगितले की, सुमारे २० लाख रुपये खर्चून सुसज्ज अशा दोन मोबाईल रुग्णवाहिका उभारण्यात आल्या आहेत. या रुग्णवाहिका गोवा डेअरीद्वारे चालवल्या जाणार असून, शेतकऱ्यांना त्यांच्या दुधाळ जनावरांसाठी दर्जेदार वैद्यकीय सेवा पुरवण्याचा आमचा संकल्प आहे, असे त्यांनी नमूद केले. या उद्घाटन सोहळ्याला उत्तर गोवा जिल्हा खनिज फाउंडेशनचे पुंडलिक खोजुरवेकर, दक्षिण गोवा खनिज ट्रस्टचे अध्यक्ष व अतिरिक्त जिल्हाधिकारी विशाल कुंडैयार, गोवा डेअरीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. सचिन तेंडुलकर, रामा परब यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.


MBBS



Ministry Of Health Of Russia
**SMOLENSK STATE MEDICAL UNIVERSITY, RUSSIA**
Invites Indian students for direct Government Admissions
Recognized by India, WHO, USA & UK, Min. Qual. 50% in XII in PCB
Satisfies all requirements of NMC of India

**UNIVERSITY** – 105 years old Medical University. The University is situated in the center of the Smolensk city. Smolensk is situated 380 km west of Moscow. Very high standards of education, strict disciplinary system. **2170** Indian students (**960** Girls) studying, **244** getting degree in **2025.** Duration 6 years including internship and License. English Medium in all years, Closed type campus system, **8** attached hospitals (**9000** Beds).
**MCI SCREENING TEST** – Our graduates of **2008** to **2024** have given **BEST** results among graduates of all foreign medical colleges (Official web sites of Indian Embassy, Moscow and NBC conducting Screening Test confirm this). Dr. Aadi Morakhia, our graduate of 2023, has topped Screening Test 2023.
**SPECIAL HOSTELS ONLY FOR INDIAN STUDENTS (BEST HOSTELS IN RUSSIA)** 2 and 4 seated big rooms, separate hostels for boys and girls.
**INDIAN MESS** - Mess with **Indian food** cooked by **Indian cooks**.
**Fee** (Tuition+Hostel+Med.Ins.) – **USD 6000** (Approx. Rs. 5,10,000/-) per year and one time payment of Rs.1,50,000/- (By Bank Draft only) which includes – Admission procedure, invitation letter, student visa, air ticket Delhi - Moscow.

**Scholarship to all Indian students.**
Bank loans are available from Indian banks.
Contact: **DR. ALOK AERON +7 9605805555 (Russia)**
**Official web site: www.sgmu.info**
**Instagram: @sgmu.info**
**Admission details: admission.sgmu.live**
INFORMATION CENTERS: (These are parents of our students)
**Margao:** Mr. Desai – 9850466525, **Ponda:** Mr. Chodankar – 8010274925
**Mapusa:** Mr. Kauthankar – 9823674160
**Curchorem:** Mrs. Naik – 9130630410, **Cuncolim:** Mr. Dessai – 9850785115